लक्ष्मी नारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ, नागपूर या विद्यापीठास ठोक रक्कम वितरीत करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन ज्ञापन क्रमांक : संकीर्ण-२०२५/ई-९७४३६९/विशि-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २९ ऑक्टोबर, २०२६.

ज्ञापन :-

लक्ष्मी नारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ, नागपूर या विद्यापीठास दैनंदिन प्रशासकीय व शैक्षणिक खर्च भागविण्याकरिता प्रति वर्ष रुपये ७ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यास दि.०४.११.२०२५ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. वित्त विभागाने दिलेल्या सहमतीनुसार सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल ते माहे डिसेंबर या कालावधीसाठी रु.५,२५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच कोटी पंचवीस लक्ष फक्त) खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे :-

१) लक्ष्मी नारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ, नागपूर यांना शासनाकडून मंजूर झालेली ठोक रक्कम ही विद्यापीठ निधीत जमा करुन सदर रक्कमेचे व्यवस्थापन करण्याची जबाबदारी नियामक परिषदेची असेल. तसेच सदर रक्कमेतून करण्यात आलेल्या खर्चाचे विनियम करुन व त्यास विद्यापीठाच्या वित्त समितीच्या मान्यतेने खर्चाच्या लेख्यांचे विवरणपत्र नियामक परिषदेपुढे सादर करुन त्यास मान्यता घेण्याची कार्यवाही विद्यापीठाच्या कुलसचिव यांनी करावी.

२) शासनाकडून ज्या प्रयोजनार्थ ठोक रक्कम मंजूर करण्यात आलेली आहे, त्याच प्रयोजनार्थ ही रक्कम खर्च करण्यात आली आहे, हे पाहण्याची जबाबदारी कुलसचिव, लक्ष्मी नारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ, नागपूर यांची असेल. (यासंदर्भात त्यांनी नियामक परिषदेची तसेच वित्त समितीची मान्यता घेऊन त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र व तपशीलवार खर्चाची माहिती उच्च शिक्षण संचालनालया मार्फत शासनास विहित वेळेत सादर करावी.)

३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने निर्गमित केलेला शासन निर्णय, क्रमांक :-भांखस-२०१४/प्र.क. ८२/भाग-III/उद्योग-४, दि.०१.१२.२०१६ तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिकेच्या तरतूदीनुसार व अटीनुसार संबंधित विद्यापीठांनी प्रत्येक बाबनिहाय असलेल्या नियमानुसार खर्च करण्यात यावा. तसेच शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने निर्गमित केलेला शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क.२१५/उद्योग-४, दिनांक २४.०८.२०१७ अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या

कार्यपध्दती धोरणामध्ये सुधारणा केली असून केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती राज्य शासनास वस्तू व सेवा खरेदीसाठी स्वीकृत करण्यास मान्यता दिली आहे. तरी त्यानुसार गव्हर्नमेंट ई मार्केटप्लेस (GeM) पोर्टलवरुन वस्तू व सेवा खरेदी करणे बंधनकारक राहिल.

२. सदरहू मंजूर झालेला निधी कोषागारातून आहरीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून सहायक संचालक (लेखा), उच्च शिक्षण संचालनालय, पुणे व नियंत्रक अधिकारी म्हणून संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१६ यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. वरील अनुदानाची सर्व कागदपत्रे व हिशेब महालेखापाल, महाराष्ट्र-१ किंवा प्रकरणपरत्वे महालेखापाल-२ नागपूर यांनी सदर कामाकरीता प्राधिकृत केलेले अधिकारी यांना तपासण्याचे अधिकार असून, त्यांनी मागणी केल्यास, संबंधित कागदपत्रे त्यांच्याकडे तपासणीकरीता विद्यापीठाने सादर केली पाहिजेत.

४. सदर खर्च " मागणी क्रमांक. डब्ल्यू-२ २२०२- सर्वसाधारण शिक्षण, लक्ष्मी नारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठाचा विकास (२२०२ K९३६), कार्यक्रम, ३१ सहायक अनुदाने "या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ मधील मंजूर तरतूदीतून खर्ची टाकण्यात यावा.

६. सदर शासन ज्ञापन, महाराष्ट्र विनियोजन अधिनियम २०२६, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३ दि.०९.०४.२०२६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे. या शासन परिपत्रकातील परिशिष्ट मधील अनुक्रमांक ९ मध्ये नमूद अटींची पूर्तता होत आहे.

७. सदर शासन ज्ञापन वित्त विभागाच्या सहमतीने (अनौपचारिक संदर्भ क्र.७०३/व्यय-५ दि.१३.१०.२०२६) निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१०२९१८०६३२५६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATAP PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=b0d6763338fc6cc4f7cf07ca60db7abc1cfac99c84ab1b5bfc0dae4609d631d0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF6895C47A84066432F5BDD1F182B4163D880AC9BD8D24A198FD0E7310BBEB59, cn=PRATAP PANDURANG LUBAL
Date: 2026.10.29 18:07:41 +05'30'

(प्रताप पां लुबाळ)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. अपर मुख्य सचिव (वित्त) मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) मंत्रालय, मुंबई.
५. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. कुलसचिव, लक्ष्मी नारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ, नागपूर.
७. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)-१/२ महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
८. महालेखापाल (लेखा परीक्षण) -१/२ महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१०.कक्ष अधिकारी, व्यय-५, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.अवर सचिव (अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.निवडनस्ती (विशि-२),उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई.